पुण्य नगरी

# ‘रवळनाथ हौसिंग’चे विविधांगी सेवाकार्य उल्लेखनीय : चव्हाण

आजरा : प्रतिनिधी

ग्रामीण भागातील सहकारी संस्थेने सहकार बँकिंग क्षेत्रात आदर्शवत प्रगती केली आहे. याबरोबरच विविध उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी देखील जपली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपले करिअर घडवता यावे, यासाठी संस्थेने ‘झेप’च्या माध्यमातून प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला आहे. संस्थेने सहकार बँकिग, सामाजिक आणि शैक्षणिक असे उल्लेखनीय सेवाकार्य केले आहे, असे गौरवोद्‌गार आजरा येथील सहा. दुय्यम निबंधक शैलजा चव्हाण यांनी काढले.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली आजरा शाखेत आयोजित अमृतमहोत्सवी व सेवानिवृत्त सभासद, यशवंत पाल्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शिवशंकर उपासे होते.


आजरा : सत्कार समारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना शैलजा चव्हाण, व्ही. के. मायदेव, महेश मजती, शिवशंकर उपासे व अन्य.

शाखा अध्यक्ष प्रा. डॉ. विनायक आजगेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. शिवशंकर उपासे म्हणाले, सहकार क्षेत्रात काम करत असताना सहकाराचा खरा अर्थ समजून घेऊन रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी वाटचाल करत आहे. त्यामुळेच व्यवसायाबरोबर समाजातील आपदग्रस्तांना, संकटात सापडलेल्या कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत देऊन आणि सुख-दुःखात सहभागी होऊन कर्तव्य भावनेने संस्थेने सभासदांसह समाजातील सर्व घटकांशी कौटुंबिक ऋणानुबंध जपले आहेत.

कार्यक्रमात दत्तात्रय आर्दाळकर, एंजेलिन डिसोझा यांचा अमृतमहोत्सवी, तर मुख्तार वाडीकर, संभाजी होलम, दौलती पाटील, सुधाकर मर्दानी, गोविंद मस्कर, सचिन पाटील यांचा सेवानिवृत्तनिमित्त तसेच चिन्मयी यादव, श्रेयस नीळकंठ, अर्पिता चिगरे, हर्षवर्धन देसाई या यशवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पेरणोली येथील आर्थिक संकटात सापडलेल्या कालेकर कुटुंबाला आर्थिक मदत केल्याबद्दल पेरणोली ग्रामपंचायतीमार्फत संस्थेचे विशेष आभार मानले. कार्यक्रमास संचालक प्रा. व्ही. के. मायदेव, महेश मजती, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे, गणपती नाईक, प्रा. राजीव टोपले, गौतम सुतार, सुरेखा भालेराव, जनार्दन दळवी यांच्यासह सभासद, ठेवीदार, विद्यार्थी उपस्थित होते. नुरजहाँ सोलापुरे यांनी सूत्रसंचालन केले. डी. के. मायदेव यांनी आभार मानले.

Kolhapur Edition
Aug 26, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com